सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

# असाधारण भाग चार

वर्ष १, अंक १४(२)] शनिवार, जून २७, २००९/आषाढ ६, शके १९३१ [ पृष्ठे ४, किंमत : रुपये १८.००

**असाधारण क्रमांक ३२**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.**

## अनुक्रमणिका

| | पृष्ठे |
|---|---|
| **सन २००९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १८.—** महाराष्ट्र विधानपरिषद (सभापती व उप सभापती) आणि महाराष्ट्र विधानसभा (अध्यक्ष व उपाध्यक्ष) यांचे वेतन व भत्ते अधिनियम, महाराष्ट्र मंत्र्यांचे वेतन व भत्ते अधिनियम, महाराष्ट्र विधानमंडळ सदस्यांचे वेतन व भत्ते अधिनियम, महाराष्ट्र विधानमंडळ सदस्यांचे निवृत्तिवेतन अधिनियम, १९७६ आणि महाराष्ट्र राज्य विधानमंडळातील विरोधी पक्षनेत्यांचे वेतन व भत्ते अधिनियम, १९७८ यांमध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी अधिनियम ... .. .. .. | १-४ |

दिनांक २७ जून २००९ रोजी मा. राज्यपालांनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा पुढील अधिनियम माहितीसाठी, याद्वारे, प्रसिद्ध करण्यात येत आहे.

**ह. बा. पटेल,**
सचिव,
महाराष्ट्र शासन,
विधी व न्याय विभाग.

---

**सन २००९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १८.**

(माननीय राज्यपालांची संमती मिळाल्यानंतर "**महाराष्ट्र शासन राजपत्रात**" दिनांक २७ जून २००९ रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम).

**महाराष्ट्र विधानपरिषद (सभापती व उप सभापती) आणि महाराष्ट्र विधानसभा (अध्यक्ष व उपाध्यक्ष) यांचे वेतन व भत्ते अधिनियम, महाराष्ट्र मंत्र्यांचे वेतन व भत्ते अधिनियम, महाराष्ट्र विधानमंडळ सदस्यांचे वेतन व भत्ते अधिनियम, महाराष्ट्र विधानमंडळ**

**सदस्यांचे निवृत्तिवेतन अधिनियम, १९७६ आणि महाराष्ट्र राज्य विधानमंडळातील विरोधी पक्षनेत्यांचे वेतन व भत्ते अधिनियम, १९७८ यांमध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी अधिनियम.**

**ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांकरिता, महाराष्ट्र विधानपरिषद (सभापती व उप सभापती) आणि महाराष्ट्र विधानसभा (अध्यक्ष व उपाध्यक्ष) यांचे वेतन व भत्ते अधिनियम, महाराष्ट्र मंत्र्यांचे वेतन व भत्ते अधिनियम, महाराष्ट्र विधानमंडळ सदस्यांचे वेतन व भत्ते अधिनियम, महाराष्ट्र विधानमंडळ सदस्यांचे निवृत्तिवेतन अधिनियम, १९७६ आणि महाराष्ट्र राज्य विधानमंडळातील विरोधी पक्षनेत्यांचे वेतन व भत्ते अधिनियम, १९७८ यांमध्ये आणखी सुधारणा करणे इष्ट आहे; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या साठाव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

१९५६ चा मुंबई ४७. १९५६ चा मुंबई ४८. १९५६ चा मुंबई ४९. १९७७ चा महा. १. १९७८ चा महा. ८.

प्रकरण एक

**प्रारंभिक**

संक्षिप्त नाव व प्रारंभ.

१. (१) या अधिनियमास, महाराष्ट्र विधानपरिषद (सभापती व उप सभापती) आणि महाराष्ट्र विधानसभा (अध्यक्ष व उपाध्यक्ष) यांचे वेतन व भत्ते, महाराष्ट्र मंत्र्यांचे वेतन व भत्ते, महाराष्ट्र विधानमंडळ सदस्यांचे वेतन व भत्ते, महाराष्ट्र विधानमंडळ सदस्यांचे निवृत्तिवेतन आणि महाराष्ट्र राज्य विधानमंडळातील विरोधी पक्षनेत्यांचे वेतन व भत्ते (सुधारणा) अधिनियम, २००९ असे म्हणावे.

(२) तो, दिनांक १ जुलै २००९ पासून अंमलात येईल.

प्रकरण दोन

**महाराष्ट्र विधानपरिषद (सभापती व उप सभापती) आणि महाराष्ट्र विधानसभा (अध्यक्ष व उपाध्यक्ष) यांचे वेतन व भत्ते अधिनियम याची सुधारणा.**

सन १९५६ चा मुंबई अधिनियम क्रमांक ४७ याच्या कलम ४अ ची सुधारणा.

२. महाराष्ट्र विधानपरिषद (सभापती व उप सभापती) आणि महाराष्ट्र विधानसभा (अध्यक्ष व उपाध्यक्ष) यांचे वेतन व भत्ते अधिनियम (यात यापुढे, या प्रकरणात, ज्याचा निर्देश "सभापती व उप सभापती आणि अध्यक्ष व उपाध्यक्ष यांचे वेतन व भत्ते अधिनियम" असा करण्यात आला आहे), याच्या कलम ४अ मध्ये, " रुपये चार लाख" या मजकुराऐवजी, "रुपये सहा लाख" हा मजकूर दाखल करण्यात येईल. १९५६ चा मुंबई ४७.

सन १९५६ चा मुंबई अधिनियम क्रमांक ४७ याच्या कलम १२ब ची सुधारणा.

३. सभापती व उप सभापती आणि अध्यक्ष व उपाध्यक्ष यांचे वेतन व भत्ते अधिनियम याच्या कलम १२ब मध्ये, " रु. ७,०००" या मजकुराऐवजी, " रु. ८,००० " हा मजकूर दाखल करण्यात येईल.

प्रकरण तीन

**महाराष्ट्र मंत्र्यांचे वेतन व भत्ते अधिनियम याची सुधारणा.**

सन १९५६ चा मुंबई अधिनियम क्रमांक ४८ याच्या कलम १० क ची सुधारणा.

४. महाराष्ट्र मंत्र्यांचे वेतन व भत्ते अधिनियम याच्या कलम १०क मध्ये, " रु. ७,००० " या मजकुराऐवजी, " रु. ८,००० " हा मजकूर दाखल करण्यात येईल. १९५६ चा मुंबई ४८.

## प्रकरण चार

## महाराष्ट्र विधानमंडळ सदस्यांचे वेतन व भत्ते अधिनियम याची सुधारणा.

१९५६ चा मुंबई ४९. **५.** महाराष्ट्र विधानमंडळ सदस्यांचे वेतन व भत्ते अधिनियम (या प्रकरणात, यात यापुढे, ज्याचा निर्देश "सदस्यांचे वेतन व भत्ते अधिनियम" असा करण्यात आला आहे) याच्या कलम ५च्या पोट-कलम (१अ) मध्ये, पुढील स्पष्टीकरण जादा दाखल करण्यात येईल.— सन १९५६ चा मुंबई अधिनियम क्रमांक ४९ याच्या कलम ५ ची सुधारणा.

" **स्पष्टीकरण.**—या पोट-कलमाच्या प्रयोजनार्थ, ज्या सदस्याच्या निवासस्थानापासून त्याच्या सर्वात जवळ असलेले विमानतळ हे राज्याच्या बाहेर येत असेल अशा सदस्याच्या संबंधात, " त्याच्या निवासस्थानापासून सर्वात जवळ असलेल्या विमानतळावरून राज्यातील " या संज्ञेत, त्याच्या निवासस्थानापासून सर्वात जवळ असलेल्या राज्याबाहेरील विमानतळाचा अंतर्भाव असेल. ".

**६.** सदस्यांचे वेतन व भत्ते अधिनियम याच्या कलम ६ मध्ये, पोट कलम (३) मधील, " रु. ७,००० " या मजकुराऐवजी, " रु. ८,००० " हा मजकूर दाखल करण्यात येईल. सन १९५६ चा मुंबई अधिनियम क्रमांक ४९ याच्या कलम ६ ची सुधारणा.

## प्रकरण पाच

## महाराष्ट्र विधानमंडळ सदस्यांचे निवृत्तिवेतन अधिनियम, १९७६ याची सुधारणा.

१९७७ चा महा. १. **७.** महाराष्ट्र विधानमंडळ सदस्यांचे निवृत्तिवेतन अधिनियम, १९७६ (या प्रकरणात, यात यापुढे ज्याचा निर्देश " विधानमंडळ सदस्यांचे निवृत्तिवेतन अधिनियम " असा करण्यात आला आहे) याच्या कलम ३ मधील, पोट-कलम (१) मध्ये,— सन १९७७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १ याच्या कलम ३ ची सुधारणा.

(क) " रुपये दहा हजार " या मजकुराऐवजी, " रुपये पंधरा हजार" हा मजकूर दाखल करण्यात येईल;

(ख) पहिल्या परंतुकामध्ये,"रुपये सातशे पन्नास" या मजकुराऐवजी, " रुपये एक हजार" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

**८.** विधानमंडळ सदस्यांचे निवृत्तिवेतन अधिनियमाच्या कलम ४अ मध्ये,— सन १९७७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १ याच्या कलम ४अ ची सुधारणा.

(क) पोट-कलम (२) मध्ये,—

(एक) " १ मे २००८ " या मजकुराऐवजी, " १ जुलै २००९ " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(दोन) " पाच हजार रुपये " या मजकुराऐवजी, " सात हजार पाचशे रुपये " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(ख) पोट-कलम (२अ) मधील,—

(एक) " १ मे २००८ " या मजकुराऐवजी, " १ जुलै २००९ " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(दोन) " पाच हजार रुपये " या मजकुराऐवजी, " सात हजार पाचशे रुपये " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(ग) पोट-कलम (२ब) मधील, " १ मे २००८ पासून दरमहा पाच हजार रुपये " या मजकुराऐवजी, " १ जुलै २००९ पासून दरमहा सात हजार पाचशे रुपये " हा मजकूर दाखल करण्यात येईल.

## प्रकरण सहा

## महाराष्ट्र राज्य विधानमंडळातील विरोधी पक्षनेत्यांचे वेतन व भत्ते अधिनियम, १९७८ याची सुधारणा.

सन १९७८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ८ याच्या कलम १०अ ची सुधारणा.

**९.** महाराष्ट्र राज्य विधानमंडळातील विरोधी पक्षनेत्यांचे वेतन व भत्ते अधिनियम, १९७८ याच्या कलम १०अ मध्ये, " रु. ७,००० " या मजकुराऐवजी, " रु. ८,००० " हा मजकूर दाखल करण्यात येईल. १९७८ चा महा. ८.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004.

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

# असाधारण भाग आठ

वर्ष १, अंक २५(२) ] शनिवार, जून २७, २००९/आषाढ ६, शके १९३१ [ पृष्ठे ४, किंमत : रुपये २०.००

असाधारण क्रमांक ५०

## प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम आणि विधी व न्याय विभागाकडून आलेली विधेयके (इंग्रजी अनुवाद).**

In pursuance of clause (3) of article 348 of the Constitution of India, the following translation in English of the Maharashtra Legislative Council (Chairman and Deputy Chairman) and Maharashtra Legislative Assembly (Speaker and Deputy Speaker) Salaries and Allowances, the Maharashtra Ministers' Salaries and Allowances, the Maharashtra Legislature Members' Salaries and Allowances, the Maharashtra Legislature Members' Pension and the Leaders of Opposition in Maharashtra Legislature Salaries and Allowances (Amendment) Act, 2009 (Mah. XVIII of 2009), is hereby published under the authority of the Governor.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

H. B. PATEL,
Secretary to Government,
Law and Judiciary Department.

---

## MAHARASHTRA ACT No. XVIII OF 2009.

*(First published, after having received the assent of the Governor, in the "Maharashtra Government Gazette", on the 27th June 2009).*

An Act further to amend the Maharashtra Legislative Council (Chairman and Deputy Chairman) and Maharashtra Legislative Assembly (Speaker and Deputy Speaker) Salaries and Allowances Act, the Maharashtra Ministers' Salaries and Allowances Act, the Maharashtra Legislature Members' Salaries and Allowances Act, the Maharashtra Legislature Members' Pension Act, 1976 and the Leaders of Opposition in Maharashtra Legislature Salaries and Allowances Act, 1978.

WHEREAS it is expedient further to amend the Maharashtra Legislative Council (Chairman and Deputy Chairman) and Maharashtra Legislative Assembly (Speaker and Deputy Speaker) Salaries and Allowances Act, the Maharashtra Ministers' Salaries and Allowances Act, the Maharashtra Legislature Members' Salaries and Allowances Act, the Maharashtra Legislature Members' Pension Act, 1976 and the Leaders of Opposition in Maharashtra Legislature Salaries and Allowances Act, 1978, for the purposes hereinafter appearing; it is hereby enacted in the Sixtieth Year of the Republic of India as follows :— Bom. XLVII of 1956. Bom. XLVIII of 1956. Bom. XLIX of 1956. Mah. I of 1977. Mah. VIII of 1978.

## CHAPTER I

### PRELIMINARY.

Short title and commencement.

1. (*1*) This Act may be called the Maharashtra Legislative Council (Chairman and Deputy Chairman) and Maharashtra Legislative Assembly (Speaker and Deputy Speaker) Salaries and Allowances, the Maharashtra Ministers' Salaries and Allowances, the Maharashtra Legislature Members' Salaries and Allowances, the Maharashtra Legislature Members' Pension and the Leaders of Opposition in Maharashtra Legislature Salaries and Allowances (Amendment) Act, 2009.

(*2*) It shall come into force with effect from the 1st July 2009.

## CHAPTER II

### AMENDMENTS TO THE MAHARASHTRA LEGISLATIVE COUNCIL (CHAIRMAN AND DEPUTY CHAIRMAN) AND MAHARASHTRA LEGISLATIVE ASSEMBLY (SPEAKER AND DEPUTY SPEAKER) SALARIES AND ALLOWANCES ACT.

Amendment of section 4A of Bom. XLVII of 1956.

2. In section 4A of the Maharashtra Legislative Council (Chairman and Deputy Chairman) and Maharashtra Legislative Assembly (Speaker and Deputy Speaker) Salaries and Allowances Act (hereinafter, in this Chapter, referred to as " the Chairman and Deputy Chairman and the Speaker and Deputy Speaker Salaries and Allowances Act"), for the words " four lakh rupees" the words " six lakh rupees" shall be substituted. Bom. XLVII of 1956.

Amendment of section 12B of Bom. XLVII of 1956.

3. In section 12B of the Chairman and Deputy Chairman and the Speaker and Deputy Speaker Salaries and Allowances Act, for the letters and figures " Rs. 7,000 " the letters and figures " Rs. 8,000 " shall be substituted.

## CHAPTER III

AMENDMENT TO THE MAHARASHTRA MINISTERS' SALARIES AND ALLOWANCES ACT.

Bom. XLVIII of 1956. **4.** In section 10C of the Maharashtra Ministers' Salaries and Allowances Act, for the letters and figures " Rs. 7,000 " the letters and figures " Rs. 8,000 " shall be substituted. Amendment of section 10C of Bom. XLVIII of 1956.

## CHAPTER IV

AMENDMENTS TO THE MAHARASHTRA LEGISLATURE MEMBERS' SALARIES AND ALLOWANCES ACT.

Bom. XLIX of 1956. **5.** In section 5 of the Maharashtra Legislature Members' Salaries and Allowances Act (hereinafter, in this Chapter, referred to as " the Members' Salaries and Allowances Act"), to sub-section (*1A*), the following *Explanation* shall be added, namely :— Amendment of section 5 of Bom. XLIX of 1956.

" *Explanation.*—For the purposes of this sub-section, in relation to a member whose nearest airport from his residence is situated out of the State, the term " nearest airport from his residence, within the State " shall include such airport situated out of the State, which is nearest from his residence.".

**6.** In section 6 of the Members' Salaries and Allowances Act, in sub-section (*3*), for the letters and figures " Rs. 7,000 " the letters and figures " Rs. 8,000 " shall be substituted. Amendment of section 6 of Bom. XLIX of 1956.

## CHAPTER V

AMENDMENTS TO THE MAHARASHTRA LEGISLATURE MEMBERS' PENSION ACT, 1976.

Mah. I of 1977. **7.** In section 3 of the Maharashtra Legislature Members' Pension Act, 1976 (hereinafter, in this Chapter, referred to as " the Legislature Members' Pension Act "), in sub-section (*1*),— Amendment of section 3 of Mah. I of 1977.

(*a*) for the words " ten thousand rupees " the words " fifteen thousand rupees " shall be substituted ;

(*b*) in the first proviso, for the words " seven hundred fifty rupees" the words " one thousand rupees " shall be substituted.

**8.** In section 4A of the Legislature Members' Pension Act,— Amendment of section 4A of Mah. I of 1977.

(*a*) in sub-section (*2*),—

(*i*) for the words, letters and figures " the 1st day of May 2008 " the words, letters and figures " the 1st July 2009 " shall be substituted ;

(*ii*) for the words " rupees five thousand " the words " rupees seven thousand five hundred " shall be substituted ;

(*b*) in sub-section (*2A*),—

(*i*) for the words, letters and figures " the 1st May 2008 " the words, letters and figures " the 1st July 2009 " shall be substituted ;

(*ii*) for the words " rupees five thousand " the words " rupees seven thousand five hundred " shall be substituted ;

(*c*) in sub-section (*2B*), for the words, figures and letters " the 1st May 2008, at the rate of rupees five thousand per month " the words, figures and letters " the 1st July 2009, at the rate of rupees seven thousand five hundred per month " shall be substituted.

## CHAPTER VI

### AMENDMENT TO THE LEADERS OF OPPOSITION IN MAHARASHTRA LEGISLATURE SALARIES AND ALLOWANCES ACT, 1978.

Amendment of section 10A of Mah. VIII of 1978.

**9**. In section 10A of the Leaders of Opposition in Maharashtra Legislature Salaries and Allowances Act, 1978, for the letters and figures " Rs. 7,000 " the letters and figures " Rs. 8,000 " shall be substituted. Mah. VIII of 1978.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004.